**प्रेस नोट** दिनांक २३/०२/२०२३

## मुंबई महानगरपालिका, व्हिजीलन्स शाखा येथील उपकर निर्धारक संकलक लाच स्विकारल्याप्रकरणी शिक्षा

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **ठाणे** |
|---|---|
| पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्रमांक | राबोडी पोलीस स्टेशन, गुन्हा नोंद क्रमांक २९/२०१४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा सन १९८८ चे कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) |
| आरोपीचे नाव व कार्यालय | **१)सुनिल बळीराम बने, उपकर निर्धारक व संकलक, व्हिजीलन्स शाखा, कांजुरमार्ग विभाग, मुंबई महानगरपालिका**<br>**२) संजय मारूती लोहोट, पर्यवेक्षी निरीक्षक, बुध्दी संपदा कक्ष,व्हिजीलन्स शाखा, कांजुरमार्ग विभाग, मुंबई महानगरपालिका** |
| मागितलेली लाचेची रक्कम | ३,००,०००/—रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,००,०००/—रुपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांचे ऑक्ट्रॉय अेजन्सी व्यवसायामध्ये जकात कर चुकविल्याच्या कारणावरून सात मालगाडया वरील नमुद आरोपी यांनी जप्त केल्या होत्या. सदर गाडयांवरील दंड कमी करण्यासाठी व त्यावर कारवाई न करण्यासाठी नमुद आरोपी यांना तक्रारदार यांच्याकडुन ३,००,०००/—रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडुन, त्यांच्याविरूध्द राबोडी पोलीस स्टेशन येथे दिनांक १८/०६/२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, ठाणे येथे नमुद आरोपीविरूध्द दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते.<br>सदर गुन्हयाची सुनावणी माननीय विशेष न्यायाधीश, श्री. अमित शेटे साहेब, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, ठाणे येथे झाली असता, सुनावणीअंती नमुद आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी आरोप सिध्द झाल्याने आरोपी क्र. १ यांना दिनांक २२/०२/२०२३ रोजी खालीलप्रमाणे शिक्षा सुनावली आहे.<br>**भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे ३ वर्षे साधी कारावासाची शिक्षा व १०,०००/—रुपये(दहा हजार) दंड तसेच दंड न भरल्यास २ महिने साधी कारावासाची शिक्षा. व कलम १३(१)(ड)सह १३(२)मध्ये ४ वर्षे साधी कारावासाची शिक्षा व १०,०००/—(दहा हजार) दंड तसेच दंड न भरल्यास २ महिने साधी कारावासाची शिक्षा.**<br>सदर सापळा कारवाई श्री. अरूणकुमार सपकाळ, तत्कालीन पोलीस निरीक्षक, लाप्रवि. ठाणे यांनी केली. तसेच गुन्हयाचा तपास श्रीमती सुषमा पाटील, पोलीस निरीक्षक यांनी केला असून, सरकारी अभियोक्ता म्हणुन श्री. संजय बी. मोरे यांनी काम पाहीले.<br>तसेच पैरवी अधिकारी म्हणून श्रीमती अश्विनी पाटील, पो.उप अधीक्षक, लाप्रवि, ठाणे व पोहवा/एस आर शहा, पोना/पारधी लाप्रवि ठाणे यांनी काम पाहीले, |

**मार्गदर्शन अधिकारी:— मा.श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :— ला.प्र.वि.ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेतस्थळ :—acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई—मेल :—spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार अॅप्लीकेशन :—acbmaharashtra.net
टोल फ्री नं :— १०६४
दुरध्वनी क्र. :— ०२२—२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस अॅप क्र. :— ९९३०९९७७००

( अनिल घेरडीकर )
अपर पोलीस अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
ठाणे परिक्षेत्र ठाणे